**पोटनिवडणुकीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी नेमणे**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा२००७/प्र.क्र. ६/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- २४ एप्रिल, २००७.**

**आ दे श**

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-१०९४/१६४/१९९४, दिनांक-२२ नोव्हेंबर, १९९४ अनुसार नगर परिषदा व नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी नेमण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार गट व निवडणुका घेणे) नियम, १९६२ व महाराष्ट्र पंचायत समित्या (मतदार गण व निवडणुका घेणे) नियम, १९६२ च्या तरतुदीप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना नेमण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी नेमण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी असे कळविले आहे की, निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उप जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या समकक्ष पदावरील व्यक्तीचीच नेमणूक करण्यात यावी.

२. राज्य निवडणूक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, कित्येकदा नगर परिषदा व नगर पंचायतींच्या एकाच प्रभागाची पोटनिवडणूक किंवा जिल्हा परिषदेतील एकाच मतदार गटाची किंवा पंचायत समितीच्या एकाच मतदार गणाची पोटनिवडणूक लागते, त्यावेळी सदर प्रभाग/मतदार गट/मतदार गण हा जिल्हयातील उप विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी नसेल तर उप जिल्हाधिकाऱ्यांना पोटनिवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती केल्यानंतर बराच प्रवास करावा लागतो. त्यामुळे काही जिल्हाधिकाऱ्यांनी अशी मागणी केली आहे की, पोटनिवडणुकीसाठी तहलिसदारांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमण्यास परवानगी असावी. त्यांच्या मागणीचा विचार करुन राज्य निवडणूक आयोगाने असा निर्णय घेतला आहे की, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या पोटनिवडणुकांसाठी शक्यतोवर उप जिल्हाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. परंतु, अशा पोटनिवडणुकीसाठी जिल्हाधिकारी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात तहसिलदारांचीही निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करु शकतील.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
कार्यासन-६ व कार्यासन-७, राज्य निवडणूक आयोग

D:\CORPORATION\aab१२१.doc